REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 10 | JULY - 2024

# शैक्षणिक साहित्य अनुदानांतर्गत शैक्षणिक साहित्य निर्मिती व उपयुक्ततेचा अभ्यास

श्रीमती जाधवर रिंकू
जि.प.प्रा.शाळा , उमरगे ता.अक्कलकोट जि.सोलापूर

**प्रास्ताविक :-**




अध्ययन-अध्यापन या दोन्हीही प्रक्रिया प्रभावी व मनोरंजक होण्यासाठी शैक्षणिक साहित्याच्या योग्य वापरामुळे कठीण संकल्पना सोप्या होतात. अध्ययन-अध्यापनात मनोरंजकता येते. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया प्रभावी होण्यास मदत होते. तसेच शिक्षक, विद्यार्थी, शैक्षणिक साहित्य यांच्यात आंतरक्रिया होतात.

शैक्षणिक साहित्य अनुदान ही सर्व शिक्षा अभियानातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेअंतर्गत शाळांना व शिक्षकांना मिळणाऱ्या अनुदानातून योग्य प्रकारे शैक्षणिक साहित्य निर्माण करणे व त्याचा वापर अध्ययन-अध्यापनात करणे अपेक्षित आहे. शाळेचा व विद्यार्थ्यांचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी याचा उपयोग होतो. या अनुदानाचा विनियोग, त्या अनुदानातून निर्माण केले जाणारे साहित्य त्या अनुदानातून निर्माण केले जाणारे साहित्य त्या साहित्याची उपयुक्तता या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन विषयाची निवड केली आहे.

**संशोधन अभ्यासाची गरज :-**

शिक्षक बाजारातून तयार शैक्षणिक साहित्य आणतात का स्वत: शैक्षणिक साहित्य तयार करतात ? दैनंदिन अध्ययन - अध्यापनात त्या साहित्याचा वापर किती प्रमाणात केला जातो ? त्याचा परिणाम काय होतो ?शाळेसाठी मिळणाऱ्या अनुदानाचा विनियोग कसा केला जातो? शैक्षणिक साहित्य निर्मिती करताना कोणत्या अडचणी येतात ? त्याचा वापर करताना कोणत्या अडचणी येतात ? त्यावर कोणत्या प्रकारची उपाययोजना करावी ? शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी व दर्जेदार शिक्षणाच्या प्रसारासाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा हेतू सफलतेच्या दृष्टीने कसा वाटचाल करीत आहे ? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी संशोधकास सदर संशोधन विषयाची आवश्यकता वाटते.

**संशोधनाचे महत्त्व :-**

सदर संशोधनाचे महत्त्व खालील मुद्यांद्वारे स्पष्ट करता येईल.

१) या अनुदानाचा विनियोग करण्याची पध्दती शिक्षकांना कळेल.
२) या अनुदानातून कोणत्या प्रकारचे साहित्य तयार केले जाते हे शिक्षकांना समजण्यास मदत होईल.
३) शिक्षक कशाप्रकारे शैक्षणिक साहित्य तयार करतात हे प्रशासनास समजेल.
४) शैक्षणिक साहित्य निर्मिती करताना येणाऱ्या अडचणी प्रशासनास समजतील.
५) अडचणींवरील उपाययोजना शिक्षकांना समजतील.
६) साहित्याच्या वापराची माहिती शिक्षकांना समजण्यास मदत होते.
७) साहित्य वापराची परिणामकारकता शिक्षकांना कळेल.
८) साहित्य वापरामागील अडचणी शिक्षकांना, प्रशासनास समजतील.

या अनुदानाचा वापर शाळेचा व विद्यार्थ्यांचा गुणात्मक दर्जा वाढण्यासाठी कितपत होतो हे शिक्षकांना, प्रशासनाला कळण्यास मदत होईल.

**संशोधन समस्येचे शीर्षक :-**
शैक्षणिक साहित्य अनुदानांतर्गत शैक्षणिक साहित्य निर्मिती व उपयुक्ततेचा अभ्यास.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**
१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मिळणाऱ्या अनुदानाच्या विनियोगाचा अभ्यास करणे.
२) शैक्षणिक साहित्याची अध्ययन-अध्यापनातील परिणामकारकता जाणून घेणे.
३) शैक्षणिक साहित्य निर्मिती व त्यांचा वापर यामध्ये येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

**संशोधनाची पद्धती कार्यपद्धती**

संशोधकाने निवडलेली समस्या वर्तमानकाळाशी संबंधित आहे तसेच ती शाळेच्या कार्याशी संबंधित आहे. त्यामुळे शालेय सर्वेक्षण पद्धती या वर्णनात्मक पद्धतीची निवड करण्यात आली आहे.

**संशोधनासाठी नमुना निवड :-**संशोधकाने सोलापूर शहरातील माध्यमिक शाळांमधील २८ शाळांची लॉटरी पद्धतीने निवड केली. त्या शाळांमधील प्रत्येकी २ शिक्षकांची निवड लॉटरी पद्धतीने करुन त्यांना प्रश्नावली देऊन भरुन घेतली. २३ शाळांमधील मुख्याध्यापकांची मुलाखत घेतली. प्रस्तुत प्रश्नावली सोलापूर शहरातील शाळांमधील फक्त मराठी माध्यमाच्या इ. ६ वी ते ८वी या वर्गांना शिकविणाऱ्या ५५ शिक्षकांना देण्यात आली. संशोधकाने अतिम मुलाखती सूचीद्वारे २३ मुख्याध्यापकांच्या मुलाखत्‌ घेतल्या.

**संशोधनाचे निष्कर्ष :-**
१. शैक्षणिक साहित्य अनुदानांतर्गत शिक्षकांना ५०० रुपये अनुदान मिळणाऱ्यांचे प्रमाण ८३.६४ टक्के इतके आहे. ५ शिक्षकांना म्हणजेच ९.०९ टक्के शिक्षकांना अनुदान मिळालेले नाही. शिक्षक अनुदानामध्ये विसंगती दिसून येते.
२. तयार शैक्षणिक साहित्य बाजारातून विकत आणणाऱ्यांचे प्रमाण ६६ टक्के आहे. ही निश्चितच चांगली बाब नाही. ३४ टक्के शिक्षक स्वतः शैक्षणिक साहित्य तयार करतात. तयार साहित्य विकत आणणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.
३. शैक्षणिक साहित्य विकत आणण्यामागील कारणांचा शोध घेता असे आढळून आले की , ३९.३९ टक्के शिक्षकांना शैक्षणिक साहित्य तयार करता येत नाहीत म्हणून ते साहित्य विकत आणतात. २४.२४ टक्के शिक्षकांना वेळ मिळत नाही.
४. शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी प्रशिक्षण आवश्यक आहे असे ८८ टक्के शिक्षकांना वाटते. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण मिळत नाही.
५. शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी ९४ टक्के शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण मिळालेले नाही.
६. शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी कृतिसत्रे आयोजित करावीत असे ९८ टक्के शिक्षकांना वाटते.
७. शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी ४६ टक्के शिक्षकांच्या मते त्यांच्या शाळेत तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करतात. १४ टक्के शिक्षकांच्या मते त्यांच्या शाळेत कोणत्याही प्रकारचे उपक्रम राबविले जात नाहीत.
८. शैक्षणिक साहित्यासाठी शाळेत वेगळी खोली नसणाऱ्यांचे प्रमाण ५४ टक्के आहे.
९. शैक्षणिक साहित्य वापरामुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया प्रभावी होते असे ९४ टक्के शिक्षकांना वाटते.
१०. शैक्षणिक साहित्य वर्गात वापरताना आवश्यक त्या सुविधा नसल्यामुळे व इतर कारणांमुळे अडचणी येतात.
११. या योजनेविषयी अत्यंत चांगली मते शिक्षकांमध्ये दिसून आली. ४४ टक्के शिक्षकांच्या मते ही योजना अत्यंत चांगली आहे. ३८ टक्के शिक्षकांच्या मते या योजनेमुळे शिक्षकांच्या नवनिर्मितीस प्रोत्साहन मिळते.
१२. शैक्षणिक साहित्यासाठी मिळणारी रक्कम अपुरी आहे,असे २० टक्के शिक्षकांना वाटते. बहुतांश शिक्षकांचा कल इंग्रजी, गणित,विज्ञान याच विषयांसाठी शैक्षणिक साहित्य बनविण्याकडे आहे. तक्ते, प्रतिकृत्या तयार करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.
१३. मागील वर्षी ८७.५० टक्के शाळांना शाळा अनुदानाची रक्कम रु. २०००/- मिळालेली होती. १२.५०टक्के शाळांना शाळा अुनदान मिळालेले नाही.
१४. शाळा अनुदानातून नकाशे, तक्ते, फर्निचर साहित्य, कपाटे, खरेदी करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.
१५. शाळा अनुदानाची रक्कम खर्च करताना ६१.९० टक्के मुख्याध्यापकांना अडचणी येत नाहीत. ३८.१० टक्के मुख्याध्यापकांना अडचणी येतात. अनुदानाची रक्कम पुरेशी नसल्यामुळे अडचणी येतात.
१६. शिक्षकांना शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी ८१.८२ टक्के मुख्याध्यापक शिक्षकांची बैठक घेऊन मार्गदर्शन करतात. फक्त १८.१८ टक्के मुख्याध्यापक त्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करतात.
१७. मुख्याध्यापक शिक्षकांच्या पाठांचे निरीक्षण करुन शिक्षक अध्यापन करताना शैक्षणिक साहित्य वापरतात याची पडताळणी करतात.

१८. कपाटात शैक्षणिक साहित्य ठेवणाऱ्यांचे प्रमाण जास्त आढळून आले आहे.
१९. संस्थेच्या लेखापरीक्षकाकडून ६३.३४ टक्के शाळांमध्ये या अनुदानाचे लेखापरीक्षण होते. २७.२७ टक्के शाळांमध्ये शासकीय लेखापरीक्षण होते. ९.०९ टक्के शाळांमध्ये लेखापरीक्षण होत नाही.
२०. या योजनेविषयी १०० टक्के मुख्याध्यापकांनी चांगले मत नोंदविले.

**शिफारशी :-**

१. सर्वच शाळांना शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी अनुदान प्रशासनाने वेळच्यावेळी उपलब्ध करुन द्यावे.
२. शिक्षकांनी स्वत: शैक्षणिक साहित्य तयार करावे. त्यासाठी विद्यार्थ्यांची मदत घ्यावी.
३. शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी अनुदानाप्राप्त सर्व शिक्षकांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करावे.
४. वेगवेगळ्या स्तरावर तसेच केंद्र/ गटसंमेलनामध्ये शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर यासाठी स्वतंत्रपणे मार्गदर्शन देण्याची व्यवस्था प्रशासनाने करावी.
५. शिक्षकांना शैक्षणिक साहित्य प्रशिक्षण देणाऱ्या विविध संस्थांची माहिती द्यावी. जास्तीत जास्त शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी या संस्थेने प्रयत्न करावेत. शाळा व्यवस्थापनाने आपल्य शाळेमधील सर्व शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठवावे.
६. प्रत्येक शाळेने स्वतंत्रपणे शैक्षणिक साहित्यनिर्मितीसाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कृतिसत्रांचे आयोजन करावे.
७. शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी शाळांमध्ये स्वतंत्र खोलीची व्यवस्था करावी.
८. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त शैक्षणिक साहित्य हाताळण्याची संधी द्यावी.
९. शिक्षकांनी प्रभावी अध्ययन-अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्यांचा वापर करावा.
१०. शैक्षणिक साहित्यांच्या वापरासाठी प्रशासनाने आवश्यक त्या सुविधा, वीज उपलब्ध करुन द्यावे.
११. शैक्षणिक साहित्यासाठी रक्कम वाढवून देण्याची तरतूद या योजनेत करावी.
१२. शिक्षकांनी पारंपारिक साधने तयार न करता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन घटकानुरुप शैक्षणिक साहित्य तयार करावे.
१३. शाळा अनुदानातून शाळांनी टिकावू स्वरुपाचे विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी शैक्षणिक साहित्य तयार करावे.
१४. जास्तीत जास्त टिकाऊ स्वरुपाचे शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यात यावे. अशा स्वरुपाचे साहित्य हे पुढील वर्षांकरीता त्या इयत्तेकरीता हस्तांतरीत करण्याची व्यवस्था करण्यात यावी.
१५. शैक्षणिक साहित्य निर्मिती करताना सर्वच विषयांसाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्यात येईल याचे नियोजन करण्यात यावे.
१६. क्षेत्रिय अधिकारी, शाळा तपासनीस, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांनी शाळा/ वर्ग भेटीच्या वेळी शैक्षणिक साहित्यांची नोंद घ्यावी व त्या साहित्यांचा वापर शिक्षक अध्यापनात कसा करतात याचे निरीक्षण करुन शिक्षकांना वेळीच मार्गदर्शन करावे. त्याचबरोबर शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर करताना येणाऱ्या अडचणींचा शोध घेवून त्यावर उपाय सुचविण्यात यावे.
१७. या अनुदानाचे लेखापरीक्षण वेळच्यावेळी शासकीय लेखापरीक्षकांकडून व्हावे.
१८. या अनुदानाच्या योग्य अंमलबजावणीसाठी व यांतील अडचणी दूर करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करावे. त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करावे. तसेच त्यांनी तयार केलेल्या साहित्यांचे परीक्षण करावे.
१९. अनुदानामागील उद्दिष्टानुसारच अनुदान वापरले जाते का याची काटेकोर तपासणी करावी.
२०. उत्कृष्ट शैक्षणिक साहित्य तयार करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात यावे. शिक्षकांनी बनविलेल्या शैक्षणिक साहित्यांचे प्रदर्शन वेगवेगळ्या स्तरावर आयोजित करावे.

**संदर्भग्रंथ सूची**


१. कायंदे पाटील ग.वि.(२००६),संशोधन पद्धती,तृतीय आवृत्ती,नाशिकःचैतन्य पब्लिकेशन
२. देशपांडे वं. सी,पाटील वा.रे.( २००६),प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती समस्या व उपाय,प्रथमावृत्ती ,पुणे.निराली प्रकाशन
३. बापट भा.गो.(१९९५),शैक्षणिक संशोधन,सुधारीत आवृत्ती,पुणेःनूतन प्रकाशन.
४. भिंताडे वि.रा.( १९९९ ), शैक्षणिक संशोधन पद्धती, सुधारीत आवृत्ती, पुणेः नूतन प्रकाशन.